## महाराष्ट्र  शासन — आरोग्य सेवा
## (जाहिरात)

जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,यवतमाळ यांचे अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्रातील महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा, गट —अ या संवर्गातील वैद्यकिय अधिकाऱ्यांची रिक्त पदे शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रं. मवैअ-1054/प्र.क्रं.241(भाग-1)/सेवा-3,दि.03/12/2018 अन्वये मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस. अर्हताधारकामधून भरावयाची असुन विहीत शैक्षणिक अर्हताधारक उमेदवारांनी खालील अटीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत असुन उमेदवारांनी सदचे अर्ज संबंधित जिल्हयामधील जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,यवतमाळ या कार्यालयामध्ये सादर करावीत, उपलब्ध रिक्त भरावयाच्या पदांची माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्रं. | जिल्हा | भरावयाची पदे | वेतन |
|---|---|---|---|
| 1 | यवतमाळ | 17 | आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या एम.बी.बी.एस. पात्रता धारकांना दरमहा रु. 80,000/- व इतर भागात काम करणाऱ्या एम.बी.बी.एस. (M.B.B.S.) अर्हताधारकांना रु. 75,000/- इतके एकत्रित मानधन दिले जाईल. |
| | एकूण | 17 | |

टिप :- सदर जाहिरातीमधील पदसंख्या कमी जास्त होऊ शकतात, याबाबतचे संपुर्ण अधिकार मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीला आहेत. मुलाखतीची तारीख जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

### अटी व शर्ती खालीलप्रमाणे

1) पदाचे नांव :- कंत्राटी वैद्यकिय अधिकारी म.वै.आ.से. गट —अ
2) शैक्षणिक अर्हता — अ) एम.बी.बी.एस. अर्हता
3) वयोमर्यादा — जाहिरात प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून वय 55 वर्षे पेक्षा जास्त नसावे.
4) अर्ज सादर करण्याचा कालावधी दिनांक 19/01/2026 ते 28/01/2026 रोजी सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत पोष्टाने अथवा समक्ष नमुद कागदपत्राच्या प्रतिसह सादर करावेत. कागदपत्राच्या प्रती सोबत सादर करतांना सदर प्रती स्पष्ट असावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
5) अर्ज सादर करावयाचे ठिकाण —जिल्हा आरोग्य अधिकारी , आरोग्य विभाग,जि.प.यवतमाळ कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत सादर करावे.

**स्पष्टीकरण** — कंत्राटी तत्वावर काम करीत असतांना कोणत्याही प्रकारे भविष्यात कायमस्वरुपी अथवा नियमित नेमणुक मिळणार नाही व उमेदवाराने तसे गृहित धरु नये अथवा कंत्राटी नियुक्तीवरील उमेदवार तसा हक्क मागु शकणार नाही. नियमित सेवेतील उमेदवार उपलब्ध झाल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता कंत्राटी वैद्यकिय अधिकाऱ्याच्या सेवा समाप्त करण्यात येतील. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. मुलाखती दिलेल्या व निवड झालेल्या उमेदवारांना जिल्हयांतर्गत कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्रात तेथील निकड लक्षात घेऊन वैद्यकिय अधिकारी गट —अ हया कंत्राटी तत्वावर 11 महिन्यासाठी नेमणुक दिली जाईल. याकरीता इच्छुक उमदेवारांनी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडे दिलेल्या विहीत वेळेमध्ये अर्ज सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडून जेव्हा उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आल्यानंतर सदर दिवशी उमेदवारांनी मुळ शैक्षणिक व इतर आवश्यक दस्ताऐवजासह / प्रमाणपत्रासह प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक राहील. आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या एम.बी.बी.एस. पात्रताधारकांना दरमहा रु. 80,000/- व इतर भागात काम करणाऱ्या एम.बी.बी.एस. अर्हताधारकांना रु. 75,000/- इतके एकत्रित मानधन दिले जाईल.

टिप 1 :- अर्जासोबत फोटो, शैक्षणिक अर्हता (सर्व वर्षाचे गुणपत्रिका) प्रयत्न प्रमाणपत्र, वयासंबंधी दाखला, महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे / भारतीय वैद्यक नोंदणी प्रमाणपत्र, आंतरवासीयता प्रमाणपत्र, असल्यास अनुभव प्रमाणपत्र (शासकिय स्तरावर काम केल्याबाबतचा अनुभव आवश्यक आहे),तसेच मागासवर्गीय असल्यास तत्संबधी जातीचा दाखला, जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र साक्षांकित देणे आवश्यक राहील. (वरिल सर्व कागदपत्राच्या प्रती स्पष्ट असाव्यात याची नोंद उमेदवारांनी घ्यावी.)

टिप 2 :- नियुक्तीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी अर्जासह टीप -1 मध्ये नमुद केलेल्या संपूर्ण कागदपत्राच्या साक्षांकित छायाप्रतीचे संचासह व मुळ कागदपत्रासह सादर करावा व जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडुन कळविण्यात आलेल्या दिवशी मुलाखतीस वेळेवर हजर राहणे आवश्यक आहे.विलंबाने हजर होणाऱ्या उमेदवारांचा मुलाखती करीता विचार केल्या जाणार नाही.

टिप 3 :- उमेदवारांनी मुलाखतीचे दिवशी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयामध्ये मुळ प्रमाणपत्रासह त्यांनी कळविलेल्या दिनांकाला हजर राहणे आवश्यक राहील, संबंधित जिल्हयाचे मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीचा निर्णय अंतिम राहील.

टिप 4 :- मुलाखतीचे दिनांक /वार ठरविणे अथवा त्यामध्ये बदल करणे, मुलाखत प्रक्रिया रद्द करणे, रिक्त पदामध्ये बदल करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीला राहील.

टिप 5 :- वर्षभरात रिक्त होणाऱ्या पदावर उपलब्ध पदाप्रमाणे प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमे उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

**(डॉ.सुभाष श.ढोले)**
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद,यवतमाळ

**कंत्राटी वैद्यकिय अधिकारी गट –अ (एम.बी.बी.एस.) या पदासाठी उमेदवाराने अर्ज करावयाचा नमुना**

पासपोर्ट साईज फोटो

| | | |
|---|---|---|
| 1 | उमेदवाराचे पूर्ण नांव | |
| 2 | पत्ता | |
| 3 | मोबाईल क्रमांक | |
| 4 | ईमेल आयडी | |
| 5 | जन्मतारीख | |
| 6 | शैक्षणिक अर्हता | |
| 7 | एकूण गुण | |
| 8 | प्राप्त गुण | |
| 9 | अंतिम वर्षाच्या गुणांची टक्केवारी | |
| 10 | पदव्युत्तर पदवीका असल्यास (गुणपत्रीका व प्रमाणपत्र सोबत जोडावे) | |
| 11 | शासकिय स्तरावर काम केले असल्यास अनुभव प्रमाणपत्र | |
| 12 | MCI Registration प्रमाणपत्र | |
| 13 | आधारकार्ड व पॅनकार्ड | |
| 14 | जातीचे प्रमाणपत्र | |
| 15 | जात वैधता प्रमाणपत्र | |
| 16 | अधिवास प्रमाणपत्र | |
| 17 | शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र | |

उमेदवाराची सही
तारखेसह